**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी (राज्य उत्पादन शुल्क सांगली) यांचे कार्यालय**
२९, वसंत कॉलनी ,मार्केट यार्ड जवळ सांगली ता मिरज जि सांगली ४१६ ४१६.
दुरध्वनी क्र -: ०२३३-२६७०८७६ email-spstateexcisesangli@gmail.com

**क्रमांक :- टिओडी 112021/2172** 1946 **सांगली, दिनांक.09 सप्टेंबर 2021**

**प्रति,**

**जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,**
**सांगली**
[**मार्फत :- निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सांगली**]

विषय :- सांगली जिल्ह्यातील ताडी दुकानाच्या ई-लिलावासंदर्भात जाहिरनामा एन.आय.सी.च्या वेबसाईटवरुन प्रसिध्द करणेबाबत....

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सांगली जिल्ह्यातील ताडी दुकानांचा सन 2021-22 (01 ऑक्टोंबर 2021 ते 31 ऑगस्ट 2022) या कालावधीकरीता ई- लिलाव-नि-निविदा पध्दतीने mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सदरची जाहिरात जिल्हा सांकेतिक स्थळावर प्रसिध्दीस देणेस विनंती आहे.

सोबत :- जाहिरात प्रत
[मा.जिल्हाधिकारी, सांगली यांच्या मान्यतेने]

**आपली विश्वासू,**

**(संध्याराणी व्ही.देशमुख)**
**अधीक्षक,**
**राज्य उत्पादन शुल्क, सांगली**

**प्रत,**

निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सांगली यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना. त्यांनी सदरचे पत्र मा.जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, सांगली यांचे कार्यालयास पोहोच करुन प्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

## सांगली जिल्हयातील ताडी दुकानांचा ई- लिलाव
## सन 2021-22 (1 ऑक्टोंबर 2021 ते 31 ऑगस्ट 2022)

महाराष्ट्र ताडी दुकाने ( ईलिलाव-नि-निविदा पध्दतीद्वारे अनुज्ञप्ती देणे) आदेश 2001 नूसार सांगली जिल्ह्यातील ताडी दुकाने ताडी वर्ष 2021-2022 (1 ऑक्टोंबर 2021 ते 31 ऑगस्ट 2022) या कालावधी करीता ई लिलाव-नि-निविदा पध्दतीने देण्यात येणार आहेत. याकरीता खाली नमूद केल्याप्रमाणे जाहिर लिलाव व निविदा स्विकारण्याची कार्यवाही करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| 1. | ई निविदा प्रसिध्द - | दि.13.09.2021 रोजी सकाळी वेळ 11.00 वा |
| 2. | ई निविदा उपलब्ध कालावधी- | दि.13.09.2021 वेळ 12.00 पासून ते दि.24.09.2021 वेळ 17.00 पर्यंत |
| 3. | प्री बिड मिटींग - | दि. 13.09.2021 वेळ 11.00 वाजता |
| 4. | EMD/ईसारा जमा करणे (Offline)- | दि.21.09.2021 ते.दि.24.09.2021 अधीक्षक, रा.उ.शु.सांगली कार्यालयात कार्यालयीन वेळेत |
| 5. | तांत्रिक लिफाफा उघडणे - | दि.25.09.2021 वेळ 18.00 पर्यंत |
| 6. | ई निविदा उघडणे - | दि.26.09.2021 वेळ 11.00 पासून |
| 7. | ई लिलाव प्रसिध्द (शक्य झालेस)- | दि.26.09.2021 वेळ 12.00 वा. |
| 8. | ई लिलावात बोली बोलण्याचा कालावधी - ( शक्य झालेस) | दि.27.09.2021 वेळ 12.00 पासून दि.27.09.2021 वेळ 19.00 पर्यंत |

महाराष्ट्र ताडी दुकाने (लिलाव-नि-निविदा पध्दतीद्वारे अनुज्ञप्ती देणे) आदेश 2001, शासन गृह विभाग अधिसूचना क्र.टी.ओ.डी.0621/प्र.क्र.89/रा.उ.शु-3, मंत्रालय मुबई दि.30.08.2021 अन्वये दि.13.09.2021 ते दि.27.09.2021 कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने ताडी लिलाव-नि-निविदा प्रक्रिया आयोजित करण्यात आलेली आहे. तरी ऑनलाईन पध्दतीने निविदा सादर करणाऱ्या निविदेकारासच www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून बोली बोलता येईल. सदर ताडी लिलावाची तपशिलवार माहिती, लिलावाच्या /निविदेच्या अटी व शर्ती, दुकानांची ठिकाणे व विहित नमुन्यातील निविदा इ. करीता www.mahatenders.gov.in व Sangli.nic.in या संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी सांगली कार्यालय, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सांगली कार्यालय व सर्व क्षेत्रिय निरीक्षक/ दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क जि.सांगली कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. नियोजित ताडी दुकाने लिलावामधून वगळण्याचे व त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, सांगली यांना राहतील.

ठिकाण :- सांगली
दिनांक :- 09 सप्टेंबर, 2021

( संध्याराणी व्ही. देशमुख)
अधीक्षक
**राज्य उत्पादन शुल्क, सांगली**